“नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक


# मुखपत्रिका


| | |
|---|---|
| कार्यालय फोन | : ०२२ – ४७४९ ८२५९ |
| WEB SITE | : http://www.nkgsbsangh.org |
| E-MAIL | : nkgsbs@gmail.com |
| कार्यालयीन वेळ | : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५) |


**।। अकरणात् मंद करणं श्रेयं ।।**

मूल्य रु. ५


**क्रमांक २ वर्ष : ४६ जुलै–सप्टेंबर २०२४**

**BOOK PACKET**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80


**TO,**


**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.


## महिलांचा स्नेह मेळावा : भगिनींस निमंत्रण

नेहमीचा श्रावणातला महिलांचा स्नेह मेळावा समारंभ यंदा जोगेश्वरी व मुलुंड येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य उपस्थित राहावे.

**जोगेश्वरी**

**तारीख :** शुक्रवार, २३ ऑगस्ट २०२४
**स्थळ :** रामेश्वर मंदिर सभागृह, सरस्वती बाग, जोगेश्वरी (पूर्व)
**वेळ :** संध्याकाळी ५ ते ७
संघ कार्यकारीणी तर्फे
**शांता पालेकर ८८५००६६३८३**
**विद्या वागळे ९८९२३७९५२०**

**मुलुंड**

**तारीख :** शुक्रवार, १६ ऑगस्ट २०२४
**स्थळ :** सुषमा मुळगांवकर यांचे **निवासस्थान,**१७०१, शारदा प्रिस्टीन, डॉ. आंबेडकर रोड, कालीदास नाट्य गृहाजवळ, मुलुंड (प.), ४०००८०.
**वेळ :** संध्याकाळी ४ ते ७ ठाणे मंच कार्यकारीणी तर्फे
**सुरेखा पालेकर – ९०८२६ ६२०१९**
**सुषमा मुळगांवकर – ९८१९८ ३६४७६**

## विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा संघातर्फे सत्कार

नेहमीच्या प्रथेनुसार यंदाही २४ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात २०२४ ह्या वर्षात विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांना व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना ज्ञातीतर्फे स्मृतिचिन्हे देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल. संबंधित व्यक्तींनी किंवा त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांची संपूर्ण नावे, पत्ता व टेलीफोन नंबर ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत संघाच्या पत्त्यावर पाठवून किंवा टेलीफोनवर कळवून आम्हांला उपकृत करावे.

१ ऑक्टोबर नंतर अशी नावे आल्यास ऐनवेळी ही स्मृतिचिन्हे तयार करणे कठीण जाते याची दखल घ्यावी.

## ठाणे मंच सादर करीत आहे
## मराठी, हिंदी गाण्यांची एक धुंद, बहारदार संगीत मैफल

**ठाणे मंचाचे हितचिंतक आणिक पुणे फेम आपले ज्ञातीबांधव .......**

श्री. शशांक मोहन दिवेकर आपल्या कलाकारांसोबत संगीताचा नजराणा सादर करणार आहेत.

तारीख : रविवार, २२ सप्टेंबर, २०२४
ठिकाण : तेंडुलकर हॉल, माहीम, मुंबई
वेळ : दुपारी ४.३० ते ७.३०

जोगेश्वरी आणि ठाणे–मुलुंड येथून बसची सोय केली आहे. प्रथम नोंदणी करणाऱ्यांस प्राधान्य.

**संपर्क :**
**सुरेश पालेकर–८९२८८५०१९३ राजेश दिवेकर–९६१९३६२४६०**
**गिरीश रेगे–९९२२१६८७२५**

संपादकीय

## आपमतलबतेचा कळस!

श्रावण बाळाचे दिवस जाऊन बराच काळ लोटला आहे. आज घरची म्हातारी आई-वडील मंडळी काही घरांमध्ये मुलाला व सुनेला ''जड'' झाली आहेत. एक साधा ''गुड मॉर्नींग बाबा'' किंवा ''आई, कशी आहेस'' असं सकाळी उठल्यावर मुलाने वा सुनेनं म्हटलं तरी ह्या बापड्यांचा जीव शांत होईल. आनंदाचे आंसू त्यांच्या डोळ्यात तरळतील. सर्व टेंशन त्यांचं निघून जाईल. पण नाही! तसं म्हणायला का कमीपणा वाटतो आजकालच्या मुलांना तो देवच जाणे! ही मुलं सदा आपल्या कामात दंग असतात किंवा तसे भासवतात. मुलाला आवडते म्हणून आईने आज ''पिठले'' केले तर रात्री ऑफीसमधून घरी आल्यावर आईवर खिसकणार. ''तुला माहीत आहे आज माझं पोट बिघडलंय. नेमकं आजच पिठले करायचं का सुचलं? जा, काहीतरी साधं दही भात दे!'' वा रे पठ्ठ्या, तू फोन करून घरी सांगू शकला असतास पोट बरं नव्हते तर. फक्त खिकसायचं, ओरडायचं. बायकोशी मात्र गुलुगुलु बोलायचं!

स्वत:ला परदेशात नोकरी मिळत नाही पण खापर कोणावर फोडायचं तर आई-बाबांवर! तुमच्यामुळे आम्ही परदेशातही जाऊ शकत नाही, ते माझे मित्र बघा कसे पटापट अमेरिका, कॅनडाला जाऊन स्थायिक झाले आहेत. या वरही आई-बाबांनी काही बोलायचं नाही. नुसता मुक्याचा मार! वृद्धाश्रमातच ठेवायचा प्लान होता त्यांचा पण नातेवाईक काय म्हणतील म्हणून गप्प आहेत. ही समस्या घरोघरी नसली तरी ह्यात हळूहळू वाढ होत असलेली जाणवते आहे. हे नक्कीच! ''जावे त्याच्या वंशा'' ह्या म्हणीप्रमाणे जे भोगतात तेच जाणतात. नातेवाईकांसमोर फोनवर यांचे कौतुकच करायचे असते. पण नातेवाईकही पक्के जाणून असतात खरं काय ते! चुकून कुणाशी जरा यांच्याबद्दल तक्रारीचा सूर लावलेला कळला की मग घरात तांडव!

असो! घरोघरी हल्लीच्या स्टीलच्या चुली! याला फार छान व सुटसुटीत नांव आहे "Generation Gap!" या वयस्करांना ही जगायचा हक्क आहे. घर त्यांचे आहे. त्यांच्या चालीरीती, सगेसोयरे, त्यांचे शेजारी, त्यांचे आजार, त्यांची औषधे! एक नाटक नाही की एक चित्रपट नाही. आपल्या जुन्या आवडत्या उपहारगृहात बसून कांदा भजी, पोहे, उसळपाव नाही. चार प्रेमाचे शब्द नाहीत. त्यांच्यापेक्षा घरी येणारी कामवाली बरी. तिला तरी पगार देतात. कधी कधी त्यांना वाटते ''अरे आम्हाला खर्चाला काही पैसे हवेत. चार दिवस देवदर्शनाला जाऊ म्हणतोय.''- पण मग हजार प्रश्न.''हल्ली महागाई किती वाढली आहे. तुम्हाला पैसे उडवायला काय?'' ''इथे दिवसभर घाम गाळतो तेव्हा कुठे पगार पडतो हातात. तो ही पुरता पुरत नाही. असे आहे ना, मग उठसुठ तुम्ही तर सिनेमाला जाता. बाहेर दरमहिन्याआड फिरायला २-४ दिवस जाता तेव्हा खर्च होत नाही? - हे मनातच - म्हणायचे! मुख्य कारण ते तरुण आहेत. त्यांचेच तर हे दिवस आहेत. हिंडण्या फिरण्याचे. आम्ही काय पडले राहू घरात निपचीत.

त्यातल्या त्यात त्यांना आई असलेली चालते कारण ती मुलाबाळांना सांभाळते. जेवणाचं बघते. बाप काय, आयतोबा! नुसता पोसून ठेवायचा. ''देवा मला मरण दे'' म्हटलं म्हणून देव थोडंच ऐकतोय! ''मानसिक त्रास'' भोगण्यासाठीच तर सत्तरी ओलांडायची असते ना! आज ही अवस्था पाच दहा टक्के घरातच जरी असली तरी ती योग्य नक्कीच नाही. यावर तरुण पिढीने विचार करणे गरजेचे आहे की नाही? पण त्यांना वेळ कुठे आहे व सांगणार कोण?

काही कमी अधिक प्रमाणात ही वस्तुस्थिती आम्ही पाहिली आहे व म्हणून हा प्रपंच!

**प्रसाद (पंकज) मोहन कसबेकर** - संपादक





## प्रकाश झोत

### बॉम्बे बार असोसिएशनच्या व्यवस्थापन समितीत सॉलीसीटर स्नेहा फेणे यांची निवड

मुंबईमध्ये वकिलांची 'बॉम्बे बार असोसिएशन' ही एक प्रभावी संघटना आहे. त्यांच्या व्यवस्थापन समितीत वीस सभासद असतात. त्यांत पांच सभासद महिला असाव्यात असा नियम आहे. यंदा विक्रमी सहा महिलांची निवड झाली आहे. त्यांत सुप्रसिद्ध साहित्यिक कै. वसंत नरहर फेणे यांची सॉलीसीटर नात श्रीमती स्नेहा श्रीहर्ष फेणे यांचा समावेश आहे. हे मानाचे व प्रतिष्ठेचे समजले जाणारे सभासदत्व मिळाल्याबद्दल स्नेहाचे हार्दिक अभिनंदन.

### डॉ. संगीता व डॉ. हेमंत पिकळे यांचे कौतुकास्पद कार्य

माहीम पश्चिम रेल्वे बाहेर काही मुस्लीम बांधवांची वस्ती आहे. रमझान नंतर ईदच्या दिवशी नमाज पढण्यासाठी व इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यासाठी तेथे मोकळे पटांगण नाही. म्हणून हे कार्यक्रम रस्त्यावरच होत असत. त्यामुळे वाहतुकीला अडथळा होत असे. ही समस्या सोडवण्यासाठी तेथीलच डॉ. संगीता व डॉ. हेमंत पिकळे यांनी त्यांच्या वैद्यकीय प्रयोग शाळेच्या आवारातच हे कार्यक्रम पार पाडण्यास स्वत: होऊन अनुमती दिली. त्यामुळे वाहतुक कोंडीतून सुटका झाली. त्यांच्या या स्तुत्य कार्याबद्दल पोलीस व इतर क्षेत्रातून उभयतांचे कौतुक झाले. टाइम्सने सुद्धा त्यांची कौतुकास्पद बातमी द्वारे दखल घेतली. यामुळे जातीय सलोखाही वाढण्यास मदत झाली. डॉक्टर दांपत्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच!

### महाराष्ट्र रणजी टीमसाठी सुलक्षण कुलकर्णी यांची प्रशिक्षक (कोच) म्हणून निवड



सुलक्षण कुलकर्णी हा नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण म्हणजेच आपल्या ज्ञातीतीलच असून त्याचे मूळ गांव 'भैरे' हे आहे.

यंदाच्या क्रिकेटमधील २०२४-२५ या दोन वर्षांच्या सिझनसाठी महाराष्ट्र टीमचा सुलक्षण कुलकर्णी हा कोच म्हणजेच प्रशिक्षक म्हणून निवडला गेला आहे. मुंबई संघातर्फे खेळताना तो आधीचा रणजी ट्रॉफी विजेता आहे.

त्यांना १६ वर्षांखालील व १९ वर्षांखालील मुलांसाठी सुद्धा निवड समितीमध्ये सहभागी करण्यात आले आहे.

पूर्वी त्यांनी तामिळनाडूचा कोच म्हणून सुद्धा काम केले आहे व त्यांत मुंबई संघावर विजय मिळवला आहे.

त्यांना 'प्रशिक्षक' म्हणून ज्ञातिबांधवांकडून खूप खूप शुभेच्छा!

### 'विवाह बंधन'

| तेजस दत्तकुमार कुलकर्णी, जोगेश्वरी | विवाह सोहळा **६. ०४. २०२४ रोजी** संपन्न झाला. | अनिता जगदीश तिळवे, अंकोला |
|---|---|---|



## कृत्रिम बुद्धिमता : चमत्कार की धोका? आपल्या आयुष्यातील एआयचा खेळ!

***आजचा काळ हा तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा काळ आहे. संगणक विज्ञानातील एक महत्वाची शाखा म्हणजे कृत्रिम बुध्दिमत्ता ( Artficial Intelligence, AI) ही म्हणजे संगणकाना मानवी बुध्दिमत्तेच्या जवळचा दर्जा देण्याचा प्रयत्न करतं.***

आजकाल AI आपल्या आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात प्रवेश करत आहे. आपण वापरत असलेल्या स्मार्टफोनपासून ते आपण बसलेल्या कारपर्यंत, AI सर्वत्र आहे. AI चे अनेक फायदे आहेत. हे आपल्याला अधिक कार्यक्षमतेने काम करण्यास, अधिक माहितीपूर्ण निर्णय घेण्यास आणि अधिक सर्जनशील होण्यास मदत करू शकते.

AI च्या काही विशिष्ट फायद्यांची उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत :

* कार्यक्षमता वाढवणे : AI चा वापर स्वयंचलितीकरणासाठी केला जाऊ शकतो, ज्यामुळे मानवी श्रमाची आवश्यकता कमी होते. यामुळे उत्पादनक्षमता आणि कार्यक्षमता वाढवण्यास मदत होते.
* निर्णय घेणे सुधारणे : AI चा वापर डेटा विश्लेषणासाठी केला जाऊ शकतो. त्यामुळे अधिक अचूक आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत होते. यामुळे चुका कमी होऊ शकतात आणि परिणाम सुधारू शकतात.
* सर्जनशीलता वाढवणे : AI चा वापर नवीन कल्पना आणि संकल्पना तयार करण्यासाठी केला जाऊ शकतो.यामुळे नवकल्पना आणि सुधारणा होऊ शकतात. कृत्रिम बुद्धिमत्तेचे अनेक फायदे आहेत. या तंत्रज्ञानाचा वापर अनेक क्षेत्रांत केला जात आहे. वैद्यकीय क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता रोग निदान, औषध शोध, वैद्यकीय सेवांचे व्यवस्थापन यासारख्या कार्यामध्ये मदत करते. AI च्या मदतीने डॉक्टर अधिक अचूक निदान करू शकतात आणि अधिक प्रभावी उपचार देऊ शकतात. उदाहरणार्थ, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर एमआरआय स्कॅनमधून कर्करोग ओळखण्यासाठी, औषधांच्या साइडइफेक्ट्सचा अंदाज लावण्यासाठी केला जातो. शेती क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर हवामान आणि जमिनीच्या गुणधर्माचा अभ्यास करून पिकांची उत्पादकता वाढवण्यात उपयोगी ठरतं. यामुळे शेतकऱ्यांना अधिक उत्पादन मिळवून आर्थिक लाभ होतो. उद्योगक्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा चा वापर उत्पादन प्रक्रिया सुधारण्यासाठी, कार्यक्षमता वाढवण्यासाठी केला जातो. यामुळे उत्पादकांचा उत्पादन खर्च कमी होतो आणि उत्पादक गुणवत्ता वाढते. वाहतूक व्यवस्थापनात, कृत्रिम बुद्धिमत्ता वाहन कोंडी कमी करण्यासाठी, ट्रॅफिक सिग्नल्स सुधारण्यासाठी मदत करते. त्यामुळे वाहतूक सुलभ होते आणि प्रदूषण कमी होते. सुरक्षा क्षेत्रात बुद्धिमत्तेचा वापर सीमा सुरक्षा, दहशत वाद, गुन्हेगार रोखण्यासाठी केला जातो. उदहरणार्थ कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सीमा सुरक्षा गुन्हेगारींचे पूर्वानुमान यासारख्या कार्यामध्ये केला जातो. या व्यतिरिक्त, कृत्रिम बुद्धिमतेचा वापर विविध प्रकारच्या उपक्रमांमध्ये केला जात आहे, जसे की.
* गृह उपकरणांमध्ये, कृत्रिम बुद्धिमता स्वयंपाकघरातील उपकरणे, लाइट्स, आणि इतर उपकरणे स्वयंचलित करण्यास मदत करते.
* सेवा उद्योगात, कृत्रिम बुद्धिमत्ता ग्राहक सेवा, विक्री, आणि मार्केटिंगमध्ये मदत करते.

* मनोरंजन उद्योगात, कृत्रिम बुद्धिमता संगीत, चित्रपट,आणि गेम्स तयार करण्यात मदत करते एकंदरीत, कृत्रिम बुद्धिमता हे एक शक्तिशाली तंत्रज्ञान आहे जे आपल्या आयुष्यातील अनेक क्षेत्रांमध्ये बदल घडवून आणत आहे. या तंत्रज्ञानाच्या फायद्यांचा पुरेपूर वापर करून आपण जगाला अधिक चांगले बनवू शकतो, कृत्रिम बुद्धिमतेचे काही विशिष्ट फायदे :
* कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढवते
* खर्च कमी करते
* नवीन संधी निर्माण करते
* समस्या सोडवण्याची क्षमता वाढवते
* निर्णय घेण्याची अचूकता वाढवते
* सुरक्षा वाढवते

**कृत्रिम बुद्धिमतेचे काही संभाव्य धोके :**
* बेरोजगारी वाढू शकते
* अन्याय होऊ शकतो
* मानवी मूल्यांचा ऱ्हास होऊ शकतो
* एआयच्या चुकीच्या निर्णयांमुळे आर्थिक नुकसान किंवा अन्याय होऊ शकतो. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर नैतिक आणि जबाबदार पद्धतीने करणे आवश्यक आहे, या तंत्रज्ञानाचे फायदे मिळवण्यासाठी आणि संभाव्य धोक्यांपासून बचाव करण्यासाठी, सरकार, उद्योग आणि समाजाने एकत्र काम करणे आवश्यक आहे.

**– लेखक: श्री. नागेश श्रीनिवास पै – Mob. 99307 16604**

A name that spells its class !
**WINOVER**
**CATERERS**
**Marriages, Thread Ceremonies, Engagement and Birthday Parties Etc.**
**WE DELIVER FOOD / SNACKS FOR PARTIES AT HOME**
**Take away and TIFFINS Or opt for Ala-carte**
**Amchi food and Variety cuisines**
ALL OVER MUMBAI-THANE-VIRAR
**Call or Whatsapp for our take away menu**
**Vinod Kaval / Ashwini / Rupali**
**98208 43392 / 90048 41198 / 98923 00608**
**Shop No. 4, Andrea Apartment off Azad Road, Vile Parle East, Mumbai - 400 057**



## एज्युकेशन सोसायटी – गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षिसे

दरवर्षी ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठी बक्षीसे दिली जातात. बक्षीसाची पात्रता पुढीलप्रमाणे

| परीक्षा | किमान पात्रता |
|---|---|
| दहावी | ८०% |
| बारावी | ७५% |
| – विज्ञान (वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला असेल तर अर्जात तसे नमूद करावे.) | ७५% |
| वाणिज्य | ७०% |
| कला | ६५% |
| पदवी व सरकारमान्य डिप्लोमा | ६०% |
| एम.ए.एम.कॉम., एम.एस्सी. पीएच.डी, वैद्यकीय क्षेत्रातील पदवी एम.बी.ए., सी.ए., कॉस्ट अकौंटस्, कंपनी सेक्रेटरी, पदव्युत्तर डिप्लोमा इत्यादी | उत्तीर्ण |
| परदेशांत घेतलेली पदवी | ए ग्रेड |

तसेच किमान राज्य पातळीवरील क्रीडास्पर्धेत ज्यांना पदके मिळाली असतील किंवा जे स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाले असतील तर संबंधितांनी त्याचाही तपशील पाठवावा. कार्यकारिणी अशाही अर्जाचा विचार करील.

**अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख ११ ऑक्टोबर २०२४**

विद्यार्थ्यांनी गुणवत्ता पत्रिकेची प्रत (झेरॉक्स), टेलीफोन नंबर, **Email** व संपूर्ण पत्ता **The NKGSB Ind & Education Society Laxmi Sadan, 361, V. P. Road, Mumbai - 400 004** या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

* विद्यार्थ्याच्या वडिलांचे मूळ गांव उत्तर कानडांत असावे व ते स्मार्त कवळे मठानुयायी असावेत किंवा आई माहेरच्या तिथल्या असून सारस्वत पोटजातीतील गृहस्थाशी विवाहबद्ध असणाऱ्या पाहिजेत.
* बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी बी.बी.एस., जर्नेलिझम किंवा बी.कॉम. शाखेत प्रवेश घेतल्यास तसे नमूद करावे.
* ज्या डॉक्टर्सनी एम.एस. किंवा एम.डी.साठी प्रवेश घेतला आहे, त्यांनाही काही पुरस्कृत बक्षिसे आहेत. संबंधितांनी याचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावा.
* गेल्या वर्षी काही परीक्षांचा निकाल उशीरा लागला होता. तेव्हा संबंधित गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांनीही अर्ज पाठवावे.

## आठवणीतील बिल्वपत्र

**माझे मन अनावर, खट्याळ अबलख वारू**
**उधळे चौफेर, कसे त्याला मी आवरू?**

माझ्याच कवितेतल्या काही ओळी. मला प्रकर्षाने आठवतात. अन् इवल्या फुलपाखराप्रमाणे सर्वत्र भिरभरते. अलीकडे मनात हुरहुर दाटते. टी.व्ही. वर अनेक 'संत मालकिा' आल्या आहेत. खरं म्हणजे एम्.ए.ला महाराष्ट्रात होऊन गेलेल्या 'संतवाङ्मया'चा अभ्यास केला होता. आज छोटासा लेख लिहिण्याचे कारण आमचे ज्ञातिजन गाव सोडून जगभर विखुरले आहेत. आज अरबी समुद्रावर वसलेल्या 'अगळी' त्याच्या परिसरातील देवदेवतांचा मला मिळालेल्या माहितीनुसार माझ्या कुवतीप्रमाणे हा लेख लिहिण्याचा मानस आहे.

सह्याद्रीच्या कुशीत काळीनदीच्या काठावर वसलेला अन् विस्मृतीत गेलेला (माझा) गाव 'अगळी' होय. कोकणीत 'अग्गड' म्हणजे खोल अथांग बोटीने किंवा लाँचने अगळीला उतरायचे असेल तर 'नासाफातर'ला उतरावे लागते. 'नासाफानर' हे नाव कसे पडले याचा संदर्भ माहित नाही. फक्त लालमातीची भिंत उभी आहे. लोक जिथे नारळ फोडतात. अशी दंतकथा आहे की कारवारहून संध्याकाळी निघालेली 'लग्नाची वरात' तिथे बोटीवरून येताना बुडाली. सगळे रसातळाला गेले. कधी कधी रात्री वाद्यांचा आवाज येतो म्हणतात. भिंतीत 'सोने' असावे म्हणून तिची बरीच पडझड केली आहे.

आमच्या शेतात असलेले 'स्वयंभू लिंग' याची माझे दादा पूजा करायचे. सकाळ-संध्याकाळ दिप लावत होते. घराच्या मागे आमचा 'देवतेमाळ' प्रसिद्ध आहे. प्रचंड वृक्षाखाली काळ्याभोर दगडाच्या अनेक सुंदर मूर्ती आहेत. परंतु चारी बाजूंनी मुंग्यांचे वारूळ असल्यामुळे अनेक साप गुण्यागोविंदाने रमतात. परसदारी 'रुंबडा'चे म्हणजे उंबराच्या फांदीवर गावकरी नेहमी फुलांचे गजरे ठेवून देवतेला वंदन करतात.

अगळीहून नदीमार्गे 'कद्र्या'ला जाताना 'कातने' गाव लागतो. तिथे सगळी शेतकऱ्यांची वस्ती. 'जोगोण' नावाचा देवाच्या नावाने उत्सव साजरा करतात. त्या दिवशी आमच्या घरात असलेली देवीची मूर्तीची पेळी घेऊन दादा जात असत. मला याबद्दल विशेष माहिती नाही. अगळीहून हळग्याला जाताना 'बोळशिट्टा' लागतो. तिथे 'निरंकारा'चे देऊळ लागते. देवळापुढे 'दीपस्तंभ' असलेल्याचे आठवते. अगळीहून हळग्याला जाताना प्रत्येक जण नमन करतो. इथे 'शिगमो' अन् दसरा' साजरा करतात म्हणे. बोळशिट्ट्यावरून जाताना उतरण लागते. तिला 'घाडसाय' म्हणत असत. तिथे भव्य-दिव्य साईबाबांचे मंदिर बांधले आहे असे कळले. त्याकाळी 'हळगे' सुधारलेले होते. तिथे खूप सुंदर 'नारायणा'चे देऊळ आहे. तिथे खूप प्रचंड 'रथयात्रा' निघते. समोर जवळच मोठे मैदान आठवते. तिथे चाळीवजा घरात 'मार्डर्न हायस्कूल' सुरू केले. तिथे मी लहान वयात अध्यापनाचे काम एक वर्ष केले. त्यावेळी अणवेकर मुख्याध्यापक होते. राव, नलिनी देसाई अन् इतर सहकारी होते.

नारायण देवळाच्या समोर मैदानात 'म्हारे' चौक म्हणजे 'महारा'चा चारीबाजूला कठडा असलेला चौक असून मध्ये खडक असं काहीतरी आठवतं. वयाच्या दहाव्या वर्षी शिक्षणासाठी गडावर आले. इतराकडून माहिती मिळाली. तिथे 'म्हारे जत्रा' भरते. हळग्याला हब्बू ज्ञातीची वस्ती आहे. एकदा एक महाराचा तरुण एका हब्बूकडे आला. बोलताना त्या व्यक्तीने सहज त्या तरुणाला सांगितले की समोरच्या झाडाचे नाव (ऐकिवात) सांग तर मी माझ्या मुलीचे तुझ्याबरोबर लग्न लावीन. त्याने अचूक उत्तर दिले. तो निघून गेल्यावर त्याच्या मुलीने बापाला विचारले की, 'बस्टली मडकी कशी शुद्ध करतात?' वडील म्हणाले, 'उज्यात (अग्नी) घालची'. तो विवाह तिला पसंत नसल्याने त्या मुलीने पहाटे देवळासमोर जाळून घेतले. त्याच दिवशी तरुण वरात घेऊन आला. दु:खी होऊन माघारी गेला. 'माघ' महिन्यात 'द्वादशी'ला म्हारे यात्रा भरते. सगळे गावकरी अन् महार येऊन पूजा करतात. गावात सगळ्या बामणांना 'आयणा' म्हणजे स्यत: विणलेला पंखा देतात अशी प्रथा आहे म्हणे.

हळग्याहून पुढे 'ढॉल' आहे. तिथे 'वश्वेश्वरा'चा सुंदर मठ आहे. दुंदुरमासात तिथे जत्रेचा उत्सव भरतो. आपले परमपूज्य श्रीस्वामी तिथे भेट देतात असे ऐकले.

टी.व्ही.वरच्या संतांच्या मालिका बघून मला माझा गाव आठवला. लिहिण्याची प्रेरणा मला कुलदैवत श्रीमंगेशाकडून मिळाली. काही चुकीची माहिती दिली गेली असल्यास ज्ञातिबांधवांनी क्षमा करावी. तसेच अनेक देवतांना मी दंडवत करते.

**लेखिका – कुंदा र. देसाई –** मो.नं. ९८१९०५२३१९



**SHREE HOMOEPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoepathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**
**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

अरुण भास्कर कसबेकर यांच्या " **कवडसे मनाचे** " ह्या पुस्तकाला वाचकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. तरी अजून ज्यांना हे पुस्तक विकत घ्यावयाचे असेल त्यांनी NKGSB SANGH च्या Office मध्ये संपर्क साधावा.
ऑफीस फोन नंबर मुखपत्रिकेच्या कव्हर पेजवर दिला आहे. धन्यवाद.

# आजचे कारवार

## कारवार कोडीबाग हमरस्त्याचे 'वीर बहाद्दूर हेंजा नाईक रोड' असे नामकरण

कोमरपंत समाजामध्ये अडीचशे वर्षांपूर्वी हेंजा नाईक हे एक शूर सेनानी होऊन गेले. त्यांचा जन्म १७३६ सालचा. तलवार चालविणे, बंदूक चालविणे, पोहणे, कुस्ती, घोडेस्वारी यात ते वाकबगार होते. मुगल व ब्रिटिश सैन्याविरुद्ध त्यांनी सशस्त्र मुकाबला केला होता. गुजरातमधील पंचमहालच्या राजांना त्यांची कीर्ती ऐकून त्यांना चकमक जंग बहाद्दूर अशी पदवी दिली होती. कोमरपंत समाजाची कारवार कोडीबाग हमरस्त्याला हेंजा नाईक यांचे नाव देण्याची मागणी होती. त्यानुसार १४ मार्च रोजी सदर रस्त्याचे **'वीर बहाद्दूर हेंजा नाईक रोड'** असे नामकरण समारंभपूर्वक करण्यात आले.

हा रस्ता गेल्या शतकात आपल्या ज्ञातीबांधवांच्या वास्तव्याने फुलून गेला होता व तो परिसर म्हणजे कारवारची शान होती. अशा कुटुंबीयांची यादी केल्यास जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. मार्केटपासून सुरुवात केल्यास डॉ. कमलाकर मुझुमदार पाहिले. त्यानंतर यादी केल्यास मारुती मंगेश नाडकर्णी, गोयिंद नारायण नाडकर्णी (डेंटीस्ट नाडकर्णी), डॉ. ए. व्ही. मुझुमदार, अंबाजी बोरकर (अंबा मिस्त्री), डॉ. दुर्गाराव तेलंग, मंगेश कसबेकर, ब्रह्मे मास्तर सपाताई पिकळे, पचातमाम बोरकर, कुमुद देवीमने, व्यंकटराव दिवेकर, नारायण (सोमा) शंकर वागळे, म्हाबळूमामा तेलंग, शिवराव (लंबू शिवा) वागळे, विठ्ठल शांताराम नाडकर्णी (ब्रुक बाँड नाडकर्णी), रा. ब. गणपतराव तेलंग, ए.डी. कुलकर्णी, ए. व्ही. कुलकर्णी, महाबळेश्वर/आपा बोरकर (हत्ती सावरकर) शांताराम वैद्य, डॉ. वामन वाघ, म्हाबा/गुणा तेलंग, नारायणराव वागळे, नागेश (आबू) तेलंग, सुब्राय (आपू) दिवेकर, पुरुषोत्तम (रायण्णा) मुझुमदार, डॉ. काशिनाथ बोरकर, महेश्वर (बाबू) कुलकर्णी (नगरपालिकेचे मुख्य अधिकारी), दत्ता वाघ, शिना/आनंद वर्टी, ह.भ.प. गंजपन वागळे, शांताराम (बाबासाहेब) नाडकर्णी (सध्या त्यांच्या घरात युनिटी हायस्कूल आहे) शामराव (डबल शामा) कसबेकर, उमानाथ दिवेकर, काशिनाथ पिंगे, शामराव मंगेश कंटक, सुरेश दत्तात्रय (पोस्टमनदेना) तेलंग.

सध्या या हमरस्त्यावर आपा बोरकर यांचे वंशज हे एकमेव ज्ञातिबांधव वास्तव्याला आहेत. एके काळच्या भरभराटी नंतर आता शुकशुकाट. कालायतस्मै नमः ।।

**– द.ना. नाडकर्णी, पारले.** – ९९६९००७२६०



**प.पू. श्रीमद् शिवानंद सरस्वती पीठाधिक्ष कवळे मठ, वाळकेश्वर येथे वैषाख शुध्द पंचमीला श्री शांतादुर्गेची पूजा करताना.**



# कारवारी पाककृति

– लेखिका : **सौ. अश्वीनी व्यंकटेश कुळकर्णी**,पारले–मोबा. नं. ९८३३३१३१००

## सुकरुंडे (सुकर उंडे)



**साहित्य –** चार वाट्या हरभरा डाळ, दोन वाट्या; गुळ, दीड वाटी चाळून भाजून घेतलेला मैदा, एक वाटी ताजे खवलेले खोबरे, चार–पाच वेलची दाणे, पाव चमचा हळद, मीठ व १ टेबलस्पून तेल, तळण्यासाठी साजुक तूप.

**कृती –** हरभरा डाळ निवडून धुवून १५ मिनिटांसाठी भिजवून घेणे. मग डाळीच्या वरती येईल असे थोडे पाणी घालून शिजवून घेणे. पाणी रहाता कामा नये. डाळ शिजवळेली कोरडी घट्टसरच असावी. मग यात बारीक चिरलेला गुळ घालून तो विरघळला की डाळ घट्टसर शिजवून घ्यावी. मिक्सरमध्ये खोबरे घालून बारीक वाटावी. वाटताना मीठ व वेलची दाणे घालावेत. मऊ आणि घट्ट पुरणासारखे करावे. मैद्यात मीठ, पाव चमचा हळद घालून भज्याच्या पीठाप्रमाणे पीठ तयार करावे. तयार पुरणाचा लिंबापेक्षा थोडा मोठा गोळा घेऊन गोल आकार देऊन मैद्याच्या मिश्रणात हलकेच बुडवून गरम तुपात सगळे सुकर उंडे तळून घ्यावेत.

१) कढईत तळताना एका वेळी दोन किंवा तीन सुकर उंडे घालावेत. जास्त घातल्यास एकमेकाना चिकटून फुटतील.

२) किंचित तांबूस रंगावरती तळून घ्यावेत.

३) गरम असतानाच वरून तूप घालून खाण्यास देणे.

४) ह्याच पद्धतीने हिरव्या रंगाचे सुकर उंडे करावेत. फक्त मैद्याऐवजी तांदळाच्या पीठामध्ये बुडवून करावेत. हा पदार्थ श्रावणात, पंचमीला, नवरात्रीमध्ये नैवेद्याचा एक प्रकार म्हणून छान आहे.

## पापलेटचे भुंजणे

**साहित्य–** तीन मध्यम आकाराचे पापलेट, चार–पाच कांदे, अर्धा तुकडा आल्याचा, ४–५ हिरव्या मिरच्या, एक मोठा चमचा लाल तिखट, खवलेले ताजे खोबरे अर्धी वाटी, चार–पाच वटंब्याची सोले, (गोवा कारवारला मिळतात) एक चमचा कारवारी सांबार पावडर, अर्धा चमचा हळद, चवीला मीठ आणि खोबरेल तेल.

**कृती–** पापलेटचे तुकडे करून घ्यवेत व स्वच्छ धुवून पाव चमचा मीठ लावून १० ते १५ मिनिटे मुरवत ठेवणे. एका जाड बुडाच्या भांड्यात दोन चमचे खोबरेल तेल गरम करून त्यावर बारीक चिरलेला कांदा, मिरचीचे तुकडे आणि आल्याचे तुकडे खमंग परतून घ्यावे. कांदा थोडा लालसर झाला की त्यात लाल तिखट, हळद, मीठ आणि धुतलेली वटंबाची सोले घालून खमंग परतून घेणे. गॅस पूर्ण बारीक करून त्यात मुरवलेले पापलेटचे तुकडे घालून अलगतपणे परतून घेणे. थोड्या पाण्याचा हबका मारून पापलेटचे तुकडे झाकून चांगली वाफ आणून शिजवून घेणे. पापलेटचे भुंजणे चांगले शिजले की त्यात खवलेले खोबरे व सांबार पावडर घालून मिनीटभर छान परतून, भुंजणे थोडीशी कोथिंबीर घालून सजवून देणे.

**टीप –** हिरवी मिरची आणि लाल तिखटाचे प्रमाण आवडीनुसार कमी जास्त करावे.

=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:

# एनकेजीएसबी को-ऑपरेटिव्ह बँकेची एमआयडीसी अंधेरी येथे नवीन कॉर्पोरेट इमारत



प. पु. श्रीमद शिवानंद सरस्वती, पिठाधिक्ष कवळेमठ, अध्यक्षा सीए हिमांगी नाडकर्णी, उपाध्यक्ष सीए शांतेश वर्टी, संचालक मंडळ आणि व्यवस्थापन मंडळाचे सदस्य, बँकेचे वरिष्ठ अधिकारी आणि इतर मान्यवर.

एनकेजीएसबी को-ऑपरेटिव्ह बँक १०६ वर्षाचा वारसा असलेली भारतातील आघाडीची बहुराज्य अनुसूचित सहकारी बैंक आहे. बँकचे १०४ शाखांचे जाळे पाच राज्यांमध्ये पसरलेले आहे. जसे की, महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, गुजरात आणि मध्य प्रदेश. बँकेचा एकूण व्यवसाय १३ हजार कोटीहून अधिक आहे. १० मे, २०२४ रोजी अक्षय्य तृतीयेला बँकेच्या रोड नं. १८, एमआयडीसी कोंडीविटा, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३ या भूखंडावर बांधण्यात येत असलेल्या त्यांच्या नवीन कॉर्पोरेट कार्यालयाचे भूमिपूजन प.पू. श्रीमद शिवानंद सरस्वती, पिठाधीश कावळे मठ यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला बँकेच्या अध्यक्षा सीए हिमांगी नाडकर्णी, उपाध्यक्ष सीए शांतेश वर्टी, संचालक मंडळ आणि व्यवस्थापन मंडळाचे सदस्य, बँकेचे वरिष्ठ अधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.


बँकेच्या अध्यक्षा सीए हिमांगी नाडकर्णी यांनी आपले स्वतःचे कॉपरिट कार्यालय असणे, हे बँकचे दीर्घकाळचे स्वप्न होते, असे मत व्यक्त केले. त्यांनी पुढे माहिती दिलो की, बैंक सतत सुधारणा आणि नाविन्यपूर्ण गोष्टी आत्मसात करण्यासाठी प्रयत्नशील आहे. बैंक आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा घेत आहे आणि मोबाइल व इंटरनेट बैंकिंगसारख्या डिजिटल चॅनेलद्वारे सेवा देत आहे. बँक शाश्वत फायदेशीर वाढीसाठी सज्ज आहे आणि नवीन कॉर्पोरेट कार्यालय बँकेच्या वर्धित व्यावसायिकतेच्या दिशेने एक पाऊल आहे.




MSIPL MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD

402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital, Andheri (West), Mumbai 400 058


Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444




*A little every month grows to something significant over time!!!*

*Invest Rs.1000/- Per month & get...*

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




***Indian E quity market has given avearge 16% return s in last 32 year s...***

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.

## NOTICE

**To become LIFE MEMBER OF NKGSB-SANGH**

We hereby request our all regular Mukhapatrika readers to become LIFE MEMBER in case any of you still not become the life member.
We get many complaints regarding not receiving Mukhapatrika.

To solve this problem, we have to confirm whether your name is registered in our list. Many a time it is observed that some ones parents were members but after their death, the next generation has not become members. It is also found your address is changed but you might not have informed your new address. Some flats are gone for re-construction but unless you inform our office, it is difficult to send Mukhapatrika. Many such cases we come across. Thus, the best way is get yourself registered for Life Membership.

Another request is, if any of your relatives, those are not life members of Sangh, ask them to take membership form from Sangh office, fill it and become Life member so their name will appear automatically in the list and they would start getting facilities like Mukhapatrika on regular basis.
We are sure, you will follow the above instructions
Thanks.
Editor

## नेकीचा प्रामाणिक अधिकारी, प. रा. दुभाषी

कै. रा. स. दुभाषी यांनी शेतकी खात्यातील तीस वर्षांच्या नोकरीत प्रामाणिकपणा, व्यवस्थितपणा, वक्तशीरपणा या आपल्या गुणांनी इतर अधिकाऱ्यांपुढे एक आदर्शच ठेवला होता. बेळगावचे विभागीय कमिशनर श्री. प. रा. दुभाषी यांनी काही आठवणीतून आपल्या वडिलांच्या या व्यक्तिमत्त्वाचे घडविलेले दर्शन, माझे वडील कै. रा. स. दुभाषी काही विख्यात व्यक्ती नव्हती की जगाला त्यांची माहिती असावी. परंतु अनेक दृष्टीने त्यांचे व्यक्तित्व असामान्य होते. त्यांच्या अंगी असे काही गुण होते की आजच्या जगांत ते खरोखरच असामान्य म्हटले जावेत. प्रामाणिकपणा, वक्तशीरपणा, व्यवस्थितपणा, आत्मविश्वास व स्वाभिमान हे गुण त्यांच्या अंगी प्रकशर्षाने वास करीत होते. आज या गुणांचा इतका अभाव आहे की या गुणांनी विभूषित झालेली व्यक्ती खरोखरीच असामान्य म्हटली जावी.

**पैशाच्या गैरव्यवहारांची चीड**

वडील मुंबई सरकारच्या शेतकी खात्यात नोकरीला होते. ते अगदी वरच्या हुद्यावर पोहोचले नसतील. परंतु अनेक महत्त्वाच्या जागांवर ते होते. आपल्या कमीजास्त तीस वर्षांच्या एकूण कारकिर्दीत त्यांनी चुकून सार्वजनिक पैशांचा गैरव्यवहार केला नाही. इतकेच नव्हे तर पैसे खाणाऱ्या अधिकाऱ्यांची त्यांना मनस्वी चीड होती. ते अशा अनेक हुद्यांवर होते की जेथे पाहिजे तर पेसे करू शकले असते. ते पुण्याच्या मोतीबाग उद्यानाचे सुपरिंटेंडेंट होते व दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सर्व मुंबई राज्याची भाजी उत्पादन व पुरवठा योजना त्यांच्या हाती होती. हजारो रुपयांचे व्यवहार तेथे होत. भाजीची किंमत एक पैशाने जरी वाढवून दिली तरी मिलिटरीकडून उत्पादकांना हजारो रुपये वाढवून देता आले असते व प्राप्तीचा वाटा त्यांना



उचलता आला असता! परंतु असा विचारही त्यांच्या मनाला कधी शिवला नाही. त्यांच्याच हाताखालच्या काही इसमांनी आपली तुंबडी भरून घेतली. अशाच एका अधिकाऱ्यावर चौकशी होऊन त्याला शिक्षा व्हावयाची पाळी आली. एकदा वडील बाहेर गेले असता तो परगावहून (मला वाटते नाशिकहून पुण्याला) आमच्या घरी आला. आंब्याची एक छोटी करंडी ठेवून गेला. गृहस्थ येऊन गेल्याचे सांगितले, करंडी बाहेरच दिवाणखान्यात राहिली होती. तो गृहस्थ ती करंडी ठेवून गेल्याचे समजताच त्यांनी ती उघडून पाहिली तो खाली पाच हजार रुपयाच्या कोऱ्या करकरीत नोटा! ताबडतोब आले तसे ते करंडी घेऊन बाहेर पडले व बस स्टँडवर बरोबर त्या माणसास पकडून (आपले कृष्णकर्म करून तो परत चालला होता) त्याची करंडी त्याला लखलाभ केली व त्याची निर्भत्सना केली. पुढे त्या अधिकाऱ्यास शिक्षा झाली. काही लोक माझ्या वडिलास म्हणत : 'अहो गंगा वाहत असता तुम्ही का नाही तुमची ही नांगाजळी भरून घेत?' अशा लोकांबद्दल माझ्या वडिलांना मनापासून तिटकारा असे. सरकारी अधिकाऱ्यांची लाचलुचपत हा आपल्या देशाच्या प्रगतीतील एक मोठा अडथळा असे आपण म्हणतो. पण अशा प्रामाणिक अधिकाऱ्यांचा सरकार (किंवा समाज) किती सत्कार करते किंवा त्यांच्या प्रामाणिकपणाचे चीज करते?

त्यांचा प्रामाणिकपणा केवळ सरकारी कामकाजांतच नव्हे तर खासगी व्यवहारातसुद्धा लहानमोठ्या गोष्टीत दिसून येत असे. १९५९ मध्ये पुण्याच्या अनेक वर्षांच्या वास्तव्यानंतर त्यांनी आपले बिऱ्हाड सांताक्रूझच्या आपल्या स्वतःच्या नवीन बांधलेल्या बंगल्यात हलविले. पुण्याला शिवाजीनगरच्या चांगल्या वस्तीत त्यांचा पाच खोल्यांचा ब्लॉक होता. जागेच्या कमतरतेमुळे एकदा कमी भाड्याने मिळालेली जागा येनकेनप्रकारेण आपल्याकडेच ठेवण्याचा शिरस्ता स्वतःस नको असेल तर, पगडी घेऊन पोटभाडेकरूला जागा द्यावयाची पण मालकाला नाही! असा सर्वसाधारण शिरस्ता. पण आमचे वडील सरळ मालकांकडे गेले, त्यांना किल्ल्या दिल्या व त्यांचे आभार मानले! मालकांनी बिचाऱ्यांनी जागा आपल्याकडे परत येईल ही आशा केव्हाच सोडून दिली होती. त्यांनी आमच्या वडिलांच्या सरळपणाचे पुन:पुन्हा आभार मानले व तुमच्यासारखी माणसे विरळा असे बोलून दाखविले.

**शब्द पालनाची निष्ठा**

मुंबईहूनच्या शेवटच्या प्रयाणापूर्वी त्यांनी घराभोवती पहली भिंत (कंपाउंड) बांधून घेतली. या भिंतीचा खर्च सर्व बंगलेवाल्यांनी वाटून घ्यावयाचे ठरले. शेजारचे बंगलेवाल्यांना वडिलांनी जाऊन खर्चाचा हिशेब दिला व त्यांचा वाटा सांगितला व म्हटले वाटल्यास तुम्ही तुमचा हिशेब करून पाहा. परत करण्याची गरजच काय? एकदा तुम्ही हिशेब सांगितला की पुन्हा बघण्याची आवश्यकता नाही! इतका त्याच्या शब्दांबद्दल लोकांचा विश्वास होता असा प्रामाणिकपणा आज आपल्या दैनंदिन अर्थव्यवहारात दिसून आला तर, काळाबाजार, भेसळ, लाचलुचपत या गंभीर वाटणाऱ्या समस्या केव्हाच लुप्त होतील. आपला दिलेला शब्द खरा करणे ही त्यांच्या जीवनाची निष्ठा होती. ही निष्ठा आपल्या समाजजीवनातून नाहीशी होत आहे ही खेदाची गोष्ट आहे. वडिलांनी अमुक एक वेळेस मी येतो, असे म्हटले आणि ते आले नाहीत, असे कधीच घडले नाही! वेळेची त्यांना किमत होती व वेळ देऊन कोणी वेळेवर आला नाही तर त्यांना फार चीड

येत असे. कोठे जाण्यासाठी रेल्वे किवा बसने प्रवास करण्याचा असेल तर ते पंधरा मिनिटे अगोदरच येत असत.

आजकाल अनेक मोठे लोकसुद्धा असे वागतात की जणु त्यांना लोकांच्या वेळेची किंमतच नाही. किंबहुना तो मोठा की जो लोकांना वाट पहावयास लावतो! सकाळी ठरविलेल्या कार्यक्रमाला प्रतोद! संध्याकाळी उगवण्याची अनेक उदाहरणे आहेत. यामुळे वाट पाहाणाऱ्या किती लोकांचा किती काळ व्यर्थ जातो व समाजजीवनाचे किती नुकसान होते, याचा हिशेब केला तर हा गलथानपणा आपल्या प्रगतीतील आडकाठी आहे, असे लक्षात येईल.

एकदा वडिलांनी नात्यातल्या एकाला आपल्या घरी जेवावयास बोलाविले. तो आलाच नाहीं! तेव्हा स्वतः थर्मासमधून जेवण घेऊन त्यांना देऊन आले. त्यांचे वय त्यांच्याहून बरेच कमी, पण त्याला आपल्या वर्तनाची लाज वाटली की नाही कोण जाणे! त्यांच्या वक्तशीरपणाचा एक भाग म्हणजे आपली बिले ताबडतोब देणे. त्यांनी दुसऱ्यांची बिले कधीही खोळंबून ठेवली नाहीत किंवा लोकांना हेलपाटे घालावयास लावले नाही! त्यांचा व्यवस्थितपणा हेवा करण्यासारखा होता ते टापटिपीचे भोक्ते होते. प्रत्येक गोष्ट जाग्यावर असावी असा त्यांचा कटाक्ष असे. वस्तू जाग्यावर ठेवली म्हणजे शोभून दिसते व पटकन मिळते. कित्येक वर्षांचे जुने कागद त्यांच्या कस्टडीत असले तर पाहिजे तेव्हा बरोबर मिळत. मग ते बर्थ सर्टिफिकेट असो अथवा डोळ्यांच्या नंबरचा दाखला असो. त्यांच्या व्यवस्थितपणाचा एक भाग म्हणजे त्यांचे खर्चाचे हिशेब अखेरीपर्यंत त्यांनी दैनंदिन खर्चाची डायरी ठेवली. त्यांत पै अन् पैचा बरोबर हिशेब असे. त्यांत कधीही चूक झाली नाही. ते कधीही योग्य तो खर्च करण्यास मागेपुढे पाहत नसत, पण हिशेबाशिवाय कधीही खर्च करीत नसत.

त्यांचा स्वाभिमान ज्वलंत आणि प्रखर होता. टिळक म्हणत की सरकारी नोकराचा अर्धा पगार वरिष्ठांची बोलणी खाण्यासाठी असतो. आमचे वडील सरकारी नोकरीत होते. पण मान खाली घालून त्यांनी वरिष्ठांची बोलणी कधीही खाल्ली नाहीत किंवा त्यांची हांजी हांजी केली नाही आपल्या खालच्या लोकांचा अपमान करणे व वरच्यांना जी हुजूर करणे ही नामर्दाची भूमिका आजकाल केवळ सरकारी नोकरीतच नव्हे तर अन्य क्षेत्रांतही दिसून येते. ही भूमिका पुरुषार्थाला शोभून दिसणारी खास नव्हे वडिलांना स्वत:बद्दल, स्वत:च्या कुटुंबियांबद्दल व देशाबद्दल अभिमान असे, त्यांनी जवाहरलाल नेहरूंच्या नॅशनल प्लानिंग कमिशनसाठी हॉर्टिकल्चरवर स्वतःच्या हस्ताक्षरांत अहवाल लिहून तयार केला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात कोबी, कॉलिफ्लावर या विदेशी भाज्यांचे उत्पादन पुष्कळच वाढले यांचे श्रेय त्यांना जाते. आपल्या कारकीर्दीत त्यांनी मोतीबागेच्या इतिहासात प्रथमच (आणि कदाचित शेवटी) तोट्यात चाललेली बाग हजारो रुपयाच्या फायद्यांत आणून दाखविली, या सर्व कामाचा त्यांना अभिमान असे. आपला मुलगा मॅट्रिकमध्ये सर्व विश्वविद्यालयात पहिला आला, याचा त्यांना फार अभिमान वाटे. अनेक वेळा मी पाश्चिमात्य देशाशी आपल्या देशाची तुलना करून आपल्या काही दोषांची निर्भत्सना करीत असे, त्या दोषांची त्यांनाही कल्पना असे. आपल्या देशाच्या भवितव्याबद्दल ते आशावादी होते ते म्हणत की आपला देशही लवकरच पुढे येईल.

– **डॉ. मेधा दुभाषी**, पुणे– **मोबा.९०११११६५४५**



## पालकहो, पाल्यांच्या बाबतीत जागरुक रहा!

**– मीरा निशिथ प्रभूवेर्लेकर**

**भारतीय युवा पिढीला पाश्चात्य संस्कृतीबद्दल असलेले जबरदस्त आकर्षण आणि अभिमानही त्यांच्या रिती पध्दतीचा अवलंब करण्यास भाग पाडतात.**

आजकाल महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे नशा करणे ही नवीन गोष्ट राहिलेली नाही. पूर्वी अक्षरमाध्यमातून वाचल्या जाणाऱ्या बातम्या आज समाज माध्यमांद्वारे प्रत्यक्ष घडताना नजरेस पडत आहेत. असेच एक दुर्दैवी दृष्य पुण्याच्या एका गडावर गेलेल्या सद्गृहस्थाच्या नजरेस पडले. त्याने ते शूट केले आणि ती ध्वनीचित्रफीत सर्वदूर पोहोचवली. त्यामध्ये १६–१७ वर्षाच्या वयोगटातील दोन विद्यार्थिनी बेहोश अवस्थेत पडलेल्या दिसतात. सुखवस्तू कुटुंबातील असाव्यात बहुधा. कोणत्याही पालकाला धडकी भरेल असे ते दृष्य. ते सद्गृहस्थ बघणाऱ्यांना सांगत होते. ‘अहो, माझी मुलगीही याच वयाची आहे हो. मलाही भीती वाटू लागलीय.’ भरल्या डोळ्यांनी बोलणाऱ्या, चिंता, भय, करुणा यांनी व्यापलेल्या त्याच्या मनाची अस्वस्थता पाहून मनाचा थरकाप झाला.

आजची पिढी ड्रग्सच्या विळख्यात कशी काय सापडते. हे विचार मनात थैमान घालू लागले. आयुष्याच्या तीन अंकी नाटकाच्या तिसऱ्या अंकात मी पदार्पण केलेले आहे. या एवढ्या विस्तीर्ण कालावधीत, बदलत्या जीवनशैलीमुळे किंवा आधुनिक मानसिकतेमुळे म्हणा, पिढ्यांतर वाढतच गेलेले दिसते. आजच्या पिढीची अशी दुर्गती होण्याला काही अंशी आई–बापच कारणीभूत आहेत असे मला वाटते. आई–वडील उच्चशिक्षण देण्यासाठी मुलांना जिथे प्रवेश मिळेल तिथे पाठवून देतात. हे आई–वडिल आर्थिकदृष्ट्या दोन स्तरातले असतात उच्चभ्रू आणि मध्यमवर्गीय. श्रीमंत आईबाप दुरदेशी गेलेल्या मुलाच्या मागणीनुरगर वाटेल तेवढा पैसा पुरवत असतात. त्यांना एवढा पैसा का लागतो. त्यांचे ते तिथे काय करतात त्याच्याशी त्यांचे काही देणे घेणे नसते. पैसा पुरवण्याचे महान कर्तव्य पार पाडल्याच्या समाधानात ते असतात. किंबहूना गर्वच असतो! आर्थिक अडचण भासते ती मध्यमवर्गीय आई–वडिलांना. ते मुलांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत स्वतः काहीही न भोगता स्वतःच्या इच्छा मारून, हौसमौजेला चिमटा देऊन पैसा वाचचत राहतात आणि तो पैसा मुलांच्या शिक्षणासाठी वापरतात. याची जाणीव गुणी मुलांना असते, आणि ते त्याचा विनियोग योग्य प्रकारे करतात. परंतु श्रीमंतांचे सुपुत्र हाती आलेल्या आयत्या पैशाचा धुव्वा उडवतात. आणि कहर म्हगजे, ‘त्या तिथे पलीकडे मुलांचे काय चालले वावडे’ याकडे लक्ष ठेवण्याची त्यांना गरज वाटत नाही. याचे कारण, मुलांवरचे आंधळे प्रेम. आत्मविश्वास आणि बेफिकिरी, जी मुलांच्या पथ्यावरच पडते. आपल्या मुलांची शिक्षणात किती प्रगती झालीये, ते तिथे काय करतात याचा मागोवा घेण्यासाठी तिथे जाऊन शिक्षकांची भेट घेण्याचीही तसदी ते घेत नाहीत. क्लब, पब, भिशी, पाट्यां, ड्रिंक्स, टुर्स याच विश्वात रमलेल्या

'मॉम डॅड' त्यांच्या या हाय-फाय बिझी शेड्युलमधून वेळ कसा काढतील नाही का? सर्वच श्रीमंत कुटुंबातील मुले अशीच निपजतात, असे बिलकुल नाही. गडगंज पैसा गाठीशी असलेले आई-बाप मुलांना ऐषोरामांची सवय न लागता, साधेपणात राहूनही सर्व लाड-गरजा पुरवतात, शिस्तीत, धाकात, उत्तम संस्कारात वाढवणारी विवेकी विचारी कुटुंबे ही पाहिलेली आहेत. निम्नस्तरीय गरीब मुलांचा प्रकार पाहिला तर हीच परिस्थिती. त्यांच्या झोपडपट्टीत घरातील वडीलधारीच व्यसनाधीन झालेली, त्यांचाव कित्ता त्यांची मुले गिरवतात. पैसे कमवण्यासाठी ड्रग्सचा धंदा करता करता ही मुलेही ड्रग्सच्या विळख्यात सापडतात हो वस्तुस्थिती आहे.

हल्ली महाविद्यालयीन विद्यार्थी सर्रास मादक द्रव्ये घेतात. परंतु त्या वाटेला न जाणाऱ्या मुलांचा 'सोवळेपणा' हा कुठल्या युगात वावरतो. अशी टर उडवून त्याला जवळपास फिरकूही देत नाहीत. हा बहिष्कार सहन न होऊन तो आपले सोवळेपण गुंडाळतो आणि नाईलाजाने ओठांना ग्लास लावतो. असा हा एकच प्याला अनेक तळीराम जन्माला घालतो. आता तर मुलामुलींचा मित्र ग्रुप असतो मुलीही'दारु पिणे ही केवळ पुरुषांचीच मक्तेदारी नाही. जणू 'हम भी कुछ कम नहीं' हे दाखवताना स्त्री-पुरुष समानतेच्या नाऱ्याला हातभार तर लावत नसतील?

आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे आजची विभक्त कुटुंब पध्दती. आजच्या कुटुंबात इन-मीन तीन सदस्य, तेव्हा शाळा कॉलेज नोकरी निमित्त दिवसभर घराबाहेर, भेट होते रात्री. 'नाही कुणाचा मेळ कुणा' अशा परिस्थितीत आई वडिलांचे लक्ष मुलांपर्यंत कसे पोचेल? पूर्वीच्या अविभक्त कुटुंबात आजी-आजोबा, काका-काकू, आत्या अशा वडिलधाऱ्यांचा असणारा धाक किंवा करडी नजर यामुळे मुलांच्या स्वैर वर्तनावर मर्यादा पडत असत. आज त्यांची उणीव भासते कुटुंबात.

भारतीय युवा पिढीला पाश्चात्य संस्कृतीबद्दल असलेले जबरदस्त आकर्षण आणि अभिमानही त्यांच्या रिती पध्दतीचा अवलंब करण्यास भाग पाडतात. मदिरापान करणे ही पाश्चात्याच्या शिष्टाचारात मोडणारी एक आतिथ्यशील बाब आहे. ड्रिंक्स, ड्रग्स, डेट्स, लिव्ह इन ही सगळी पाश्चात्यांची देणगी. युवा पिढीच्या जीवनात वावटळ उठवणारे हे भारताकडे वाहत आलेले पश्चिमी वारे घातकच आहेत. आज आपल्या संस्कृतीला कळू लागले आणि आपल्या इथल्या लोकांना त्यांची संस्कृती 'ग्रेट' वाटू लागलीय. तेव्हा युवापिढीला भारतीय संस्कृतीचे महत्व पटवून देण्यासाठी सामाजिक संस्थानी पुढाकार घ्यावा. आणि एक गोष्ट सुचवावीशी वाटते की नोकरी करणाऱ्या आयांनी निदान मुले वयात येण्याच्या काळात आजवर तिने जमवलेल्या लठ्ठ बँक बॅलन्सवर समाधान मानून, पैशाचा आणखी हव्यास न धरता नोकरीला राम ठोकून मुलांवर नजर ठेवावी. हा रामबाण उपाय नसला तरी मुलांच्या चंगळबाजीवर नियंत्रण ठेवणारा एक छोटासा उपाय ठरू शकेल. आजची युवा पिढी प्रगतीशील भारताचे भावी नागरिक आणि उद्याचे आधारस्तंभ आहेत. तेव्हा हा आधार भक्कम बनवण्याची गरज वाटते.

***



***Respected Members, NKGSBS MC, I am sending herewith copy of the letter going to be posted to our community members for sharing e mail addresses and cell nos. With best regards Mukund Nadkarni.***

## The North Kanara Goud Saraswat Brahman Sangh

( FOUNDED 1935 )

Registered with Charity Commissioner Mumbai
Regd. No. F - 4426 under Bombay Public Trusts Act - 1950

Laxmi Sadan, 361,
Vithalbhai Patel Road,
Girgaum, Mumbai 400 004
E-mail : nkgsbs@gmail.com
Web. : www.nkgsbsangh.org
Tel. : 022-4749 8259

To

May 15, 2024

**Our beloved NKGSB Community members,**

Dear Sir/ Madam,

Currently the Sangh has been including announcements and communications in quarterly publication – Mukhapatrika.

In order to improve speed & reliability of such communications as well as to include our next generation, the use digital modes such as e-mail and what's app has become essential. The Mumbai Manch of the Sangh has taken up initiative of updating your contacts with e-mail addresses and mobile numbers. Needless to say, Mukhapatrika will continue to be a main medium of communication and announcements, if any.

You are requested to share the following information and provide consent to the Sangh for contacting through e mail and or on cell / whatsapp as and when necessary.

1. Your E Mail address: ……………………………………………………………………………
2. Your Cell No.: ……………………………………………………………………………………
3. Your what's app no. if different from above: ……………………………………………
4. Contacts of your children staying with you or separately in India or abroad.
   a. Full Names and their E mail addresses: ……………………………………………
   b. What's app Nos: ………………………………………………………………………
   c. Country of residence and name of the place: ……………………………

We would need your consent as under for Sangh to be compliant to provisional IT Act - Rules & Regulations of our country.

**" I hereby, accord my consent to NKGSB Sangh to contact me through digital modes – e mail, SMS's, Whatsapp etc ".**

Above details may please be e mailed to at e mail address nkgsbs@gmail.com , Attn: **NKGSB Sangh Mumbai Manch.**

Alternatively you can fill in details in this letter and sendthe same to **NKGSB Sangh Mumbai Manch** at above address.

With best regards

For Mumbai Manch, NKGSB Sangh

| | | | |
|---|---|---|---|
| **(Vandana Sohoni)** | **(Amit Wagh)** | **(Pradeep Dabholkar)** | **(Mukund Nadkarni)** |
| **Secretary** | **Jt Secretary** | **Treasurer** | **Vice Chairman** |

।। श्री रामेश्वर प्रसन्न ।। स्थापना १९२६


# श्री रामेश्वर मंदिर संस्थान

सरस्वती बाग, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०००६०.

## *श्री रामेश्वर मंदिराचा ९८ वा वर्धापन दिन सोहळा*

मंगळवार, दिनांक १९ मार्च २०२४ (फाल्गुन शुद्ध दशमी, शके १९४५) रोजी साजरा झाला. या मंगलदिनी खालीलप्रमाणे देवकृत्ये केली आहेत. सर्व भक्तगण बहुसंख्येने उपस्थित रहून श्री रामेश्वराच्या तसेच श्री मंगेशरुद्राच्या कृपाप्रसादास सुपात्र झाले.

**आपले नम्र, विश्वस्त मंडळ – श्री रामेश्वर मंदिर संस्थान**









## *मंत्रपुष्पांजली*

नेहमी पूजा व आरती अंती आपण मंत्रपुष्पांजली म्हणतो. परंतु त्याचा मराठीत अर्थ बहुतेकांना माहीत नसतो. तो कळावा ह्या उद्देशाने मराठी भाषांतर केलेली मंत्रपुष्पांजली सर्वांसाठी खास देत आहोत.

**ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।**

**ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः**

**ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने ।**

**नमो वयं वैश्रवणाय कुर्महे स मे कामान्कामकामाय मह्यम् ।**

**कामेश्वरो वैश्रवणो ददातु । कुबेराय वैश्रवणाय । महाराजाय नमः ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्यायी स्यात्सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात्पृथिव्यै समुद्रपर्यंता या एकराळिति तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुतस्यावसन्गृहे आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति**

**एकदंतायविद्महे वक्रतुंडाय धीमहि तन्नोदंती प्रचोदयात्**

**श्रीशुभं भवतु**

मंत्र पुष्पांजलीमध्ये एकूण चार कडवी आहेत ती खालीलप्रमाणे – या मंत्राचा अर्थ समजणे आवश्यक आहे. अर्थ समजला की अनुभूतीचा आनंद नक्कीच होईल. प्रत्येक श्लोकाचा अर्थ येणेप्रमाणे :

**श्लोक १** यज्ञेन यज्ञं अयजन्त देवा: तानि धर्माणि प्रथामानि आसन् तेह नांक महिमाान: सचन्तयत्र पूव्रे साध्या :संति देवा :

**श्लोकाचा अर्थ –** देवांनी यज्ञाच्याद्वारे यज्ञरुप प्रजापतीचे पूजन केले. यज्ञ आणि तत्सम उपासनेचे ते प्रारंभीचे धर्मविधी होते. जिथे पूर्वी देवता निवास (स्वर्गलोकी) करीत असत ते स्थान यज्ञाचरणाने प्राप्त करून साधक महानता (गौरव) प्राप्त करते झाले.

**श्लोक २** ओम राजाधिराजाय प्रसह्यसाहिने। मनोवयं वैश्रवणाय कुर्महे। स मे कामान् कामाकामाय मह्यं। कामेश्वरो वैश्रवणो ददातु कुबेराय वैश्रवणाय / महाराजाय नमः

**श्लोकाचा अर्थ –** आम्हाला सर्वकाही (प्रसह्य) अनुकुल घडवून आणणाऱ्या राजाधिराज वैश्रवण कुबेराला आम्ही वंदन करतो. तो कामेश्वरकुबेर कामनार्थी अशा मला (माझ्या सर्व कामनांची) पूर्ति प्रदान करो.

**श्लोक ३** (प्रथमार्थ) ओम स्वस्ति। साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ट्यं राज्यं महाराज्यमाधिपत्यमये।

**श्लोकाचा अर्थ–** आमचे सर्व कल्याणकारी राज्य असावे. आमचे साम्राज्य सर्व उपभोग्य वस्तुंनी परिपूर्ण असावे. येथे लोकराज्य असावे. आमचे राज्य आसक्तिरहित, लोभरहित असावे अशा परमश्रेष्ठ महाराज्यावर आमची अधिसत्ता असावी.

**श्लोक ३** (द्वितियार्थ) समन्तपर्यायीस्यात् सार्वभौमः सार्वायुषः आन्तादापरार्धात् । पृथीव्यै समुद्रपर्यंताया एकराळ इति।

**श्लोकाचा अर्थ –** आमचे राज्य क्षितिजाच्या सीमेपर्यंत सुरक्षित असो. समुद्रापर्यत पसरलेल्या पृथ्वीवर आमचे एकसंघ दीर्घायु राज्य असो. आमचे राज्य सृष्टीच्या अंतापर्यंत म्हणजे परार्ध वर्ष पर्यंत सुरक्षित राहो.

**श्लोक ४** तदप्येषः श्लोकोभिगीतो। मरुतः परिवेष्टारो मरुस्तस्यावसन् गृहे। आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ।।

**श्लोकाचा अर्थ –** या कारणास्तव अशा राज्याच्या आणि राज्याच्या किर्तीस्तवनासाठी हा श्लोक म्हटला आहे. अविक्षिताचा पुत्र मरुताच्या राज्यसभेचे सर्व सभासद असलेल्या मरुतगणांनी परिवेष्टित केलेले हे राज्य आम्हाला लाभो हीच कामना.

संपूर्ण विश्वाच्या कल्याणाची, आकांक्षेची व सामर्थ्याची जाणीव प्रत्येकाला करून देणारी ही विश्वप्रार्थना. अंतीम सत्य शोधण्याचे मार्ग अनेक असतील, पंथोपपंथ विविध असतील परंतु सर्वाचा उद्देश एक, सर्व मलपंथांच्या विषयी समादर, सर्व मतपंधाच्या प्रगतीच्या सर्वाना समान संधी असलेले, सर्वहितकारी राज्य तेव्हांच शक्य आहे जेव्हा संपूर्ण मानवजातीमध्ये सहिष्णु समरस एकात्मतेची भावना असेल.

–अनुवादक : **प्रसाद कसबेकर**

## ☺ ☺ ☺ विजूले चुटकुले ☺ ☺ ☺

डॉक्टर : ह्यो गोळ्यो दिवसातल्यान तीन पटी घेवच्यो आणि एक गोष्ट लक्षात दवरची, निदतना दार आण खिडक्यो उघड्यो दवरच्यो – ताप वतलो तुमगेतो.

दोन दिसान डॉक्टर विचारता किते म्हणता तुम्ही? गेलो की ना तुमगेलो ताप?

पेशंट : ताप ना गेलो पण घरातले भांगर आणि पैशे मात गेले!

टिचर : अरे मंगेश, सांग पळव्या मित्र प्रेमाचे एखादे उदाहरण!

मंगेश : टिळक आणि आगरकराले इतले प्रेमाचे नाते आशिल्ले की आगरकर गेलो तेन्ना टिळक रडताशिल्लो आणी टिळक गेलो तेव्हा आगरकर रडताशिल्लो खूप रडताशल्लो!

– विजय सदानंद वागळे,ठाणे–९८२१६०७५७७



# श्रद्धांजली

## Mohan Shantaram Kasbekar

**Our Beloved Pappa**

***पुण्यतिथी***

## कै. मोहन शांताराम कसबेकर



पाहता तुझला देवा पाहणे संपले
पाहुनिया डोळेभरी मन तृप्त झाले.

**ह्या ८ सप्टेंबर रोजी ऋषिपंचमीला इहलोक त्यागून ५२ वर्षे पूर्ण होत आहेत.**

**देहावसान :** ऋषि पंचमी (भाद्रपद शुद्ध पंचमी)

**दिनांक १२ सप्टेंबर १९७२**

(आम्हां सर्वांना तुझी आठवण येत नाही असा एकही दिवस जात नाही)

**–प्रसाद मोहन कसबेकर कुटुंब**

**संध्या विलास सोहोनी कुटुंब**

**नवनीत मोहन कसबेकर कुटुंब**

# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या
## (मागील अंकानंतर )
## उल्लेखनीय देणग्या

### १. श्री विश्वनाथ व कुटुंबीयांतर्फे एज्युकेशन सोसायटीला दोन लाख रुपयांची देणगी

पूर्वी दिंडोशी येथे राहणारे श्री. विश्वनाथ (विसू) शेषगिरी कुलकर्णी हे ग्लॅक्सो या औषध निर्मिती कारखान्यात वरीष्ठ पदावयर होते. त्यांचे आजोबा म्हणजे अवर्सा येथील हत्ती सावकार विसुमामा हे स्थानिक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. त्यांच्यापुढे शाळेत कुठल्याही प्रकारचा भ्रष्टाचार नसे. त्यांचे मोठे चिरंजीव डॉ. विद्याधर हे अंधेरी येथे प्रॅक्टीस करतात. त्यांनी अलीकडे आपली आई म्हणजे विसूमामांची पत्नी, श्रीमती हेमलता यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे. डॉक्टरांच्या पत्नी डॉ. वैशाली या डेंटीस्ट आहेत. त्यांनी आपले वडील श्री. गणपती हरी कामत यांच्या स्मरणार्थ आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे. विसूमामाचे धाकटे चिरंजीव डॉ. पराग बोईसर येथे हॉस्पिटल चालवतात. त्यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांची देणगी दिली आहे. अशा प्रकारे कुलकर्णी कुटुंबीयाकडून दोन लाख रुपयांची देणगी मिळाली आहे.

### २. श्री कृष्ण वागळे यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी.

पूर्वी घाटकोपर येथे राहणारे श्री. कृष्ण (सुनील) गणपत वागळे हे आय आय टी चे इंजीनियर होते. दहा वर्षांपूर्वी त्यांचे दुःखद निधन झाले. यंदा त्यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या पत्नी प्रा. रश्मी व कन्या हिमांगी नीलेश गाडा यांनी एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### ३. डॉ. प्रेमानंद देसाई यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी

प्रभादेवी येथे राहणारे डॉ. प्रेमानंद दुर्गाराव देसाई हे रसायन शास्त्रातील डॉक्टरेट होते. ते एका औषध निर्मितीच्या कंपनीत वरीष्ठ जागेवर होते. गेल्या ऑक्टोबर महिन्यात अमेरिकेत त्यांच्या कन्येच्या सान्निध्यात त्यांचे अकस्मात निधन झाले. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती सुधा यांनी पतीच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### ४. डॉ. नरेन्द्र यार्दी यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीला आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी

डॉ. नरेन्द्र रामतीर्थ यार्दी हे आयआयटी पवईचे डॉक्टरेट आहेत व बडोदा येथे त्यांचा व्यवसाय आहे. मागे तीन वेळा त्यांनी एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांच्या देणग्या दिल्या होत्या. अलीकडेच त्यांनी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.



## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १) | श्री अरूण भास्कर कसबेकर यांजकडून | १,५०० |
| २) | दी एन् के जी एस् बी को ऑप बँकेकडून | १०,००० |
| ३) | श्रीमती शांताबाई (चंपूताई)रमाकांत बोरकर यांच्या १५ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री अजित यांजकडून | १,००१ |
| ४) | श्री सदानंद नागेश नाडकर्णी यांच्या२८व्या पुण्यतिथी निमीत्त नाती सुदिप्ता व अनुष्का यांजकडून | ५,००० |
| ५) | श्री सद्‌चिदानंद गणपत नाडकर्णी व श्री चंद्रकांत बाळकृष्ण फडणीस यांच्या स्मरणार्थ अनामिका कडून | १,००१ |
| ६) | श्री विश्वंभर त्रिंबक कसबेकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री देवीदास यांजकडून | १०,००१ |
| ७) | कै.श्री जिवबा नागेश सरदेसाई यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती आशा यांजकडून | २५,००० |
| ८) | श्री वासुदेव जनार्दन कामत यांच्या स्मरणार्थ पत्नी शांता यांजकडून | २५,००० |

## वैद्यकीय साहाय्या प्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्री गोविंद मारूति कसबेकर यांच्या १३व्या पुण्यतिथी निमीत्त पुत्र श्री विनय यांजकडून | ३,००० |

## वृद्ध सेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री कमलाकर यशवंत तेलंग यांच्या पुण्यतिथी निमीत्त पत्नी श्रीमती सुरेखा ( सुमन) यांजकडून | ५,००० |
| २. | श्रीमती शांताबाई(चंपूताई)रमाकांत बोरकर यांच्या १५व्या पुण्यतिथी निमीत्त पुत्र श्री अजीत यांजकडून | १,००१ |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री कृष्णा गणपत वागळे (सुनील) यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ पत्नी प्रा. रश्मी कृष्णा वागळे व कन्या श्रीमती हिमांगी निलेश गाडा यांजकडून | १,००,००० |
| २. | दि एन् के जी एस् बी को. ऑप. बँकेकडून | १०,००० |
| ३. | श्री प्रेमानंद दुर्गाराव देसाई यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुधा यांजकडून | १,००,००० |
| ४ | श्रीमती शांताबाई( चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या १५ व्या पुण्यतिथी निमीत्त पुत्र अजीत यांजकडून | १,००१ |
| ५. | श्रीमती गंगाबाई व काशिनाथ त्रिंबक नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ नाडकर्णी कुटुंबियांकडून | ३००० |
| ६. | श्री अशोक काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती श्यामला यांजकडून | २५०० |

| | | |
|---|---|---|
| ७. | श्री अशोक काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती विद्या व दामात श्री मनोज भांडारकर यांजकडून | २५०० |
| ८. | श्री विश्वनाथ शेषगिरी कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र डॉ.पराग यांजकडून | १,००,००० |
| ९. | श्री गणपती हरी कामत यांच्या स्मरणार्थ कन्या डॉ. वैशाली विद्याधर कुलकर्णी यांजकडून | ५०,००० |
| १०. | श्रीमती हेमलता विश्वनाथ कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र डॉ. विद्याधर यांज कडून | ५०,००० |
| ११. | डॉ. नरेंद्र रामतीर्थ यार्दी यांजकडून | ५०,००० |

## श्रद्धांजली

**कै. सावित्रीबाई (कावेरी) नागेश नाडकर्णी (सांवरपै)**

३९ वे पुण्यस्मरण - निधन : रविवार२८ जुलै १९८५

तुझ्या प्रेमळ आठवणीशिवाय गेल्या ३९ वर्षात एकही दिवस गेला नाही. श्री मंगेश तुझ्या आत्म्यास शांती देवो. तुझा आशीर्वाद आमच्या पाठीशी अखंड राहो. तुझ्या स्मृतीस सादर प्रणाम.


**कै. विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी यांच्या तर्फे**

**।। कालाय तस्मै: नम: ।।**

| | नाव | गाव | सध्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | मंगेश (संतोष) सदानंद आंबे | अस्नोटी | माहीम |
| २. | शैलजा शंकर फेणाणी | चेंडिये | दादर |
| ३. | सतीश शांताराम गायतोंडे | काणकोण | पारले |
| ४. | अजिता अशोक गायतोंडे | हळगा | जोगेश्वरी |
| ५. | त्रिंबक अनंत कसबेकर | कडवाड | मडगांव |
| ६. | डॉ.रघुनंदन दत्तात्रय मुझुमदार | अंकोला | पुणे |
| ७. | जयराज दिगंबर नाडकर्णी | बसुणगे | फोंडा |
| ८. | शेषगिरी वासुदेव नाडकर्णी | अंकोला | अंकोला |
| ९. | श्रीमती प्रफुल्ला आनंद पिकळे | अंकोला | फ्रेंच ब्रीज |
| १०. | पुष्पा रमेश सुखटणकर | सदाशिवगड | सदाशिवगड |
| ११. | विनायक कमलाकर वागळे | हाणकोण | मालाड |
| १२. | दुर्गाप्रसाद (बच्चू) शांताराम वैद्य | येल्लापूर | माहीम |
| १३. | श्रीमती नंदिता रजनीकांत वर्टी | सदाशिवगड | विरार |
| १४. | श्रीमती कुसुम प्रभाकर स्थळेकर | अंकोला | अंधेरी |



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक प्र. मो. कसबेकर यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.